खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर

तृतीय वर्ष कला

सेमिस्टर पाचवे

इतिहास

(HIS - 391 – MN)

स्वातंत्र्योत्तर भारत (१९४७-१९९१)

स्वातंत्र्योत्तर भारत (१९४७-१९९१)

घटक १ : स्वातंत्र्य आणि फाळणी (१०)

अ) फाळणी व परिणाम

आ) संस्थानांचे विलीनीकरण - काश्मीर, जुनागढ व हैद्राबाद

इ) भारतीय राज्यघटना आराखडा आणि वैशिष्ट्ये

घटक २ : नेहरू युगातील राष्ट्रनिर्माण (१०)

अ) पंचवार्षिक योजना आणि आर्थिक विकास

आ) इस्त्रो बार्क आयआयटी युजीसी आयआयएम एम्स डीआरडीओ यांची निर्मिती स्थापना

इ) परराष्ट्र धोरण - अलिप्ततावादी चळवळ, भारत - चीन संबंध, भारत - पाकिस्तान संबंध

घटक ३ : आव्हाने आणि बदल (१०)

अ) आणीबाणी, ऑपरेशन ब्ल्यू स्टार, आसाम संकट, नाम २० कलमी कार्यक्रम, हरित क्रांती, भारत सोव्हिएत करार, बांगलादेशची निर्मिती

आ) संगणक व दूरसंचार क्रांती, पंचायत राज

इ) उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण धोरण (खाऊजा)

घटक १ : स्वातंत्र्य आणि फाळणी

अ) फाळणी व परिणाम

प्रास्ताविक

वेव्हेलनंतर मार्च १९४७ मध्ये माऊंटबॅटनने व्हॉईसरॉय बनल्यावर ३ जून १९४७ रोजी फाळणीचे संकेत दिले. लोकमतानुसार वायव्य सीमा प्रांत भारतात किंवा पाकमध्ये सामील केला जाणार होता. आसामातील मुस्लीम बहुसंख्य असलेल्या सिल्हेट जिल्ह्यास भारतात सामील व्हायचे की पूर्व बंगालमध्ये हा निर्णय घ्यायचा होता. मुस्लीम बहुसंख्य असलेल्या प्रदेशाच्या प्रतिनिधींनी आपल्या प्रांताची फाळणी करायची की नाही हे ठरवायचे होते. सार्वमतानुसार सिल्हेट वायव्य सीमा प्रांत पूर्व बंगाल व पश्चिम पंजाबने पाकीस्तानात तर पश्चिम बंगाल व पूर्व पंजाबने भारतात सामील होण्याचा निर्णय घेतला. इंग्लडच्या संसदेत जुलै १९४७ मध्ये भारतीय स्वातंत्र्याचा कायदा पास झाला आणि १५ ऑगस्ट पासून भारत व पाकीस्तान यांना स्वातंत्र्य मिळून त्यांची फाळणी झाली.

फाळणी आवश्यक होती...

इंग्रजाची फोडा व राज्य करा निती, मुस्लीम फुटीरतावाद व मुस्लीम लीग कार्यामुळे फाळणी झाली.याच विचार गटांनी काँग्रेसला फाळणी स्वीकारण्यास भाग पाडले.काही लेखक कणखर मुत्सद्दी भूमिका घेतली असती तर फाळणी टळली असती अशी भूमिका घेत काँग्रेस नेत्यांना दोष देतात. पाकीस्तानात मात्र फाळणी आवश्यक व तर्कसंगत असल्याचे मानले जाते.मुस्लीम राष्ट्रवाद भारताच्या इतिहासात अंतर्भूत असल्याचा त्यांचा युक्तीवाद आहे.फाळणीचा फायदा घेणारे जीना यांना फाळणीस जबाबदार धरले जाते.जीनांची ताकद दिवसेंदिवस वाढत गेली.त्यांना कायदा इ आझम म्हटले जाऊ लागले.मुस्लिमांमध्ये मध्यमवर्गाचा उदय उशीरा झाल्याने त्यांच्यात जातीयवाद वाढत गेला याचा फायदा इस्लाम धोक्यात आहे नारा देणाऱ्या लीगने घेतला व जीनांचे महत्त्व वाढले असे मत पं.नेहरू यांनी मांडले आहे.हिंदु महासभेमुळेही जातीयवाद वाढून फाळणी झाली अशी टिका होते. भारताला स्वातंत्र्य मिळताना मोठा प्रदेश गमवावा लागला.सीमेवर धार्मिक राष्ट्र उभे राहिले.जातीय दंग्यांची बीजे रोवली गेली.भारताला स्वातंत्र्य मिळाले पण लगेचच जातीय दंगे निर्वासीतांचे पुनर्वसन काश्मीरसाठी पाकीस्तानने केलेले आक्रमण संस्थांनांचे राष्ट्रविरोधी धोरण अशा अनेक समस्यांना तोंड दयावे लागले.

फाळणीचे परिणाम

कमी जमीन व जादा लोकसंख्या

अखंड भारतातील ८१ टक्के लोकसंख्या फाळणीनंतर भारतात आली तर एकूण जमीनीपैकी ७७ टक्के जमीन शिल्लक राहिली.तर पाकीस्तानला १९ टक्के लोकसंख्या व २३ टक्के जमीन मिळाली.तुलना करता जादा लोकसंख्या भारतात राहुनही जमीन मात्र फाळणीत कमी मिळाली.

मोठी प्राणहानी

फाळणीनंतरच्या दंगलीत कत्तली जाळपोळ लुटालुट व त्यानंतर महापूर रोगराई उपासमार व कडाक्याची थंडी यात मोठी प्राण हानी झाली.दंगलीत किती माणसे मारली गेली ते सांगता येणार नाही तर नंतरच्या नैसर्गिक आपत्तीत ५ लाखापेक्षा जास्त लोक मृत्यूमुखी पडले.

सांप्रदायिकतेत वाढ

जमातवादामुळे फाळणी झाली.पण फाळणीनंतर दोन समाजातील तणाव कमी होण्याऐवजी वाढला.गांधीहत्या दंगली व निर्वासित होताना झालेली हत्याकांड व राजकीय हेतूने पाकिस्तानातून होणाया कारवाया यामुळे सांप्रदायिकतेत वाढ झाली.

निर्वासितांचा लोंढा

फाळणीनंतरही हिंदु मुस्लिम संघर्ष सुरूच राहिला.पाकिस्तानात जातीय दंगे झाले.परिणामी जवळजवळ एक कोटी हिंदु आपली मालमत्ता सोडून भारतात आले.या निर्वासितांच्या पुनर्वसनाचा भारतावर मोठा आर्थिक ताण पडला.दुसया महायुध्दातील आर्थिक ताणानंतर लगेचच निर्वासितांचा ताण आल्याने भारताच्या आर्थिक विकासास ते घातक ठरले.

निर्वासितांमुळे अडचणी

जवळ जवळ एक कोटी निर्वासित पाकिस्तानातून भारतात आले.त्यांनी पंजाब व दिल्लीत वास्तव्य केले तर पूर्व पाकिस्तानातील निर्वासितांनी कलकत्ता व आजुबाजुस वास्तव्य केले.त्यामुळे या शहरांची लोकसंख्या भरमसाठ वाढली.तसेच संप बंद हरताळ खुन या गोष्टी नित्याच्या झाल्या.याचाही विपरित परिणाम भारतावर झाला.

निर्वासितांचे पुनर्वसन कठींण

पाकिस्तानातील पंजाब व सिंध या सधन सुपिक प्रदेशातून भारतात मोठया संख्येने निर्वासित भारतात आले होते.भारतातून निर्वासित झालेल्यांच्या जमीनी या लोकांना दयाव्या असे ठरले पण अशी जमीन कमी व कोरडवाहू मान्सून वर आधारित होती.तसेच निर्वासितही खेडयात पुनर्वसनास राजी नव्हते.त्यामुळे पुनर्वसनाचा प्रश्न जटील बनला.

निर्वासितांच्या इतर समस्या

पाकिस्तानातून आलेले बहुसंख्य निर्वासित व्यापारी व शेतकरी होते.भारतात येताना ते आपली सर्व मालमत्ता सोडून आले होते.पाकिस्तानने अशा लोकांना नुकसानभरपाई देण्याची टाळाटाळ केली.त्यामुळे भारत सरकारवर पुनर्वसनाचा मोठा ताण पडला.

शेतीचे नुकसान

भारताची सुपिक जमीन उत्कृष्ट कालवे पाटबंधारे पाकिस्तानात गेली तर भारताच्या वाटयास आलेल्या जमीनीत सिंचनाची उत्तम सोय नव्हते हे नुकसान भारतास सहन करावे लागले.

अन्नधान्याची टंचाई

उत्तम कसदार सिंचनाची सोय असलेली अधिक जमीन पाकिस्तानात गेल्याने भारतात अन्नधान्याची मोठी टंचाई निर्माण झाली.भारतास अन्नधान्य आयात करावे लागले.१९४८मध्ये १३० कोटी तर १९४९ मध्ये १५० कोटी रूपयांचे अन्नधान्य आयात केले.

महागाई

अन्नधान्याची आयात करावी लागल्याने ते महाग झाले.तसेच ताग व कापूस उत्पादक मोठा प्ररदेश पाकिस्तानात गेल्याने ताग व कापूस महाग हो}न त्यापासून बनणाया वस्तुंच्याही किंमती वाढल्या.तसेच गिरण्यांचेही नुकसान झाले.

पशूधन नुकसान

अखंड भारतातील उत्तम व अधिक पशूधन पाकिस्तानात गेले तर कमी व निम्नप्रतीचे पशूधन भारताच्या वाटयास आल्याने शेती उत्पादनावरही त्याचा विपरित परिणाम झाला.

उद्योगधंद्यांचे नुकसान

भारताच्या ताग उत्पादक प्रदेशाचा ७० टक्के प्रदेश पाकिस्तानला मिळाला तर ताग व कापूस गिरण्या भारतात राहिल्या.या गिरण्यांना फाळणीनंतर कच्चा माल मिळणे अवघड झाले.त्यामुळे त्यांचे नुकसान झाले व बेकारीही वाढली.

बाजारपेठेवर दुष्परिणाम

भारतीय उद्योगांच्या उत्पादनास फाळणीपुर्वी असलेली मागणी फाळणीनंतर साहजिकच घटली.त्यामुळे येथील उद्योगांवर मंदीचे संकट कोसळले.व भारतीय उद्योगांचे मोठे नुकसान झाले.

गुंतवणुक खालावली

फाळणीनंतर कच्चा माल टंचाई व महागाई वाढली.त्यात कोटी पेक्षा जादा निर्वासितां,मुळे वाहतुक व्यवस्था कोलमडली.शासनाला आपली शक्ती निर्वासितांच्या पुनर्वसनातच खर्ची घालावी लागल्याने इतर आवश्यक समस्या सोडवणे अशक्य झाले.यामुळे गुंतवणुकीचे प्रमाण कमी झाले.

वाहतुकव्यवस्था कोलमडली

भारतातील १७ टक्के रेल्वे मार्ग पाकिस्तानात गेले.भारतातून ८३००० व पाकिस्तानातून ८३००० रेल्वे कर्मचारी स्थलातंरित झाले.पण भारतातून गेलेल्या कर्मचायांमध्ये प्रामुख्याने रेल्वे ड्राइव्हर फायरमन व रेल्वे वर्कशा^प मधील तंत्रज्ञ कर्मचारी होते.तर पाकिस्तानातून भारतात आलेल्यांमध्ये कारकूण तिकीट कलेक्टर गार्ड होते.त्यामुळे सुरूवातीस काही काळ वाहतूक व्यवस्था कोलमडली.

समतोल बिघडला

पूर्वी उद्योग व्यवसाय व व्यापारात समतोल होता.पण फाळणीमुळे तो बिघडला.अन्नधान्य विविध यंत्रे अनेक वस्तू आयात कराव्या लागल्या.यामुळे उद्योग व्यवसाय व्यापारातील समतोल बिघडला.

पाकिस्तानला अधिक फायदा

फाळणी करताना अखंड भारताचे जे येणे व देणे होते त्यांचेही वाटप झाले.त्यात येणे जास्त तर देणे कमी पाकिस्तानच्या वाटयास गेले.सार्वजनिक कर्जाचा वाटा देण्यासही पाकिस्तानने टाळाटाळ केली.त्यामुळे पाकिस्तानचा अधिक फायदा झाला.

भारताचे आर्थिक नुकसान

फाळणी नंतर भारत पाकिस्तानला ५५ कोटी देणार होता.पण पाकिस्तानने नियम मोडले.भारतावर आक्रमण केले त्यामुळे भारताने ५५ कोटी देण्याचे नाकारले.तेव्हा गांधीजींनी उपोषण केले.भारतास ५५ कोटी दयावे लागले शिवाय याच घटनाक्रमातून गांधीजींची हत्या झाली.शिवाय त्यानंतरच्या दंगलीतही मोठे आर्थिक नुकसान सोसावे लागले.

भारताची धर्मनिरपेक्षता सिध्द

भारताने फाळणी होऊनही धर्म निरपेक्षतेचे तत्त्व कधी सोडले नाही.जगातील सर्वात मोठे धर्मनिरपेक्ष लोकशाही राष्ट्र अशी जगभर भारताची प्रतिमा निर्माण झाली.सर्व धर्म समभाव हे घटनेचे तत्त्व सर्वजण पाळतात.

अशा प्रकारे अखंड भारताची फाळणी होऊन भारत व पाकिस्तान निर्माण झाले. या फाळणीचे परिणाम वरिल प्रमाणे आहेत.

घटक १ : स्वातंत्र्य आणि फाळणी

आ) संस्थानांचे विलीनीकरण - काश्मीर, जुनागढ व हैद्राबाद

प्रास्ताविक

२६ जानेवारी १९५० रोजी भारतीय घटना लागू झाली.त्यापूर्वी संस्थाने विलिनीकरणाचे आव्हान भारतापुढे होते.कारण त्याशिवाय भारत एकसंघ राष्ट्र होणार नव्हते.याकामी भारताचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी पुढाकार घेतला.

स्वातंत्र्यपूर्व काळातील ब्रिटिश सरकार व संस्थानांचे संबंध

कंपनीकडून १८५८ मध्ये सत्ता ब्रिटिश पार्लमेंट कडे गेली.नव्या ब्रिटिश शासनाने संस्थानात रेसीडेन्ट नेमुन संस्थांनाच्या परराष्ट्र धोरणावर शस्त्रास्त्रे व दारूगोळयावर नियंत्रण ठेवले.संस्थाने खालसा करण्याचे धोरण सोडून दिले.संस्थानांच्या प्रश्नावर विचार करण्यास संस्थानिकांच्या प्रतिनिधींचे नरेंद्र मंडळ १९२१ मध्ये नेमण्यात आले.१९२७ मध्ये संस्थानिक व ब्रिटिश सरकार यांचे संबंध निश्चित करण्यास बटलर कमिटी नेमली.या समितीने भारतीय संस्थाने ब्रिटिश राजसत्तेशी बांधील असून भारतातील ब्रिटिश सरकारशी नाही असा अहवाल दिला.भारतीय ऐक्याच्या दृष्टीने ही गोष्ट घातक होती.कारण भविष्यात भारतास स्वातंत्र्य मिळाले तरी संस्थाने ब्रिटिश राजसत्तेच्या सार्वभौमत्वाखाली राहणार होती.

गोलमेज परिषदेत ब्रिटिश भारत व संस्थानांचे मिळून संघराज्य बनवावे असा विचार पुढे आला.१९३५ च्या कायद्याने संघराज्याच्या मध्यवर्ती कायदेमंडळात संस्थानिकांना प्रतिनिधीत्व दिले.पण संघराज्यात सामील व्हायचे की नाही हे संस्थानांना ऐच्छिक ठेवले.ही घटनात्मदृष्टया विसंगती होती.पण १९३५ च्या कायद्याचा संघराज्य विषयक भाग प्रत्यक्षात न आल्याने त्यात संस्थानिकांना मिळालेल्या सवलतीही मागे पडल्या.त्रिमंत्री योजना १९४६ मे मध्ये जाहीर झाली त्यातही ब्रिटिश शासन भारतास स्वातंत्र्य देइल त्यावेळी संस्थानिकाना मात्र स्वातंत्र्य देईल तो प्रदेश भारत सरकारकडे सोपवणार नाही अशी तरतुद होती.त्यामुळे ५६३ नवी राज्ये निर्माण होण्याचा धोका होता.पण सरदार वल्लभभाई पटेल व पंडित नेहरूंनी खंबीरपणे हा धोका टाळला.संस्थाने भारतात विलीन झाली.विलीनीकरणास काश्मीर जुनागढ व हैद्राबादेतून विरोध झाला.लष्करी कारवाई करून त्यांचे विलिनीकरण करण्यात आले.

भारताला स्वातंत्र्य व संस्थानिकांचा प्रश्न

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारतास स्वातंत्र्य मिळाले.स्वातंत्र्याच्या कायद्यानुसार संस्थानिकांशी केलेले सर्व करार रद्द करण्यात आले.भारतात किंवा पाकिस्तानात विलीनी होणे किंवा स्वतंत्र राहणे असे तीन पर्याय संस्थानांन पुढे होते.

भारताचे सरकार व काँग्रेसचा संस्थानांनी स्वतंत्र राहण्यास विरोध होता.शेवटचे ग.ज. माऊंटब^टन यांनी ही संस्थानांना एका देशात विलीन होण्याचा सल्ला दिला.१५ जून १९४७ रोजी पं.नेहरूंनी जाहीर केले की.भारताच्या संघराज्यात स्वायत्तता व समान भूमिकेवरून सामील होणे किंवा संघराज्याची अधिसंत्ता मान्य करणे हे दोनच मार्ग

संस्थानिकांपुढे खुले आहेत.तिसरा पर्याय नाही.संस्थाने राजकीय पोकळीत राहु शकत नाहीत.....भारताची सुरक्षितता धोक्यात येईल अशी कोणतीही गोष्ट आम्ही संस्थानिकांकडून होऊ देणार नाही.एखाद्या परकीय सरकारने हिंदी संस्थानाचे स्वातंञ्य मान्य केले तर ते आम्ही शत्रूत्वाचे कृत्य समजू.

स्वतंत्र भारताचे हे संस्थानांबाबतचे धोरण प्रसिध्द झाल्यावर संस्थानांच्या तथाकथीत स्वातंञ्याला धक्का बसला.५ जुलै ४७ रोजी गृहखाते स्थापन झाले.गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल बनले.संरक्षण दळणवळण व परराष्ट्र संबंध एवढयाच क्षेत्रात संस्थानांनी केंद्र शासनाचे नियंत्रण मान्य करावे अशी त्यांना विनंती करण्यात आली.आपण आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवु शकणार नाही हे ओळखुन अनेक संस्थाने भारतात विलीन झाली.म्हैसुर कोचीन पतियाला या मोठया संस्थांनाचा त्यात समावेश होता.काही संस्थानिकांना राज्यप्रमुख उपराज्यप्रमुख नियुक्त करून भारत सरकारनेही संस्थानिकांचा आदर केला.परंतु तीन संस्थानांनी विलीन न होता स्वतंत्र अस्तित्व टिकविण्याचा प्रयत्न केला.त्यांचेही विलीनीकरण शांततेत पार पडावे अशी पटेलांची इच्छा होती.पण या तीन संस्थानांनी विरोध करून समस्या अधिकच वाढविल्या.शेवटी भारत सरकारला कठोर पा}ले उचलावी लागली.

काश्मिरचे विलीनीकरण

१८४६ मध्ये गुलाबसिंगाने इंग्रजांकडुन १ कोटी रूपयास काश्मिरप्रांत विकत घेतला.त्याच्या वंशातील हरिसिंग १९४५ मध्ये गादीवर आला.या प्रांतात ७७ मुस्लिम व २४ टक्के हिंदु बौध्द शीख व इतर होते.भारत व पाकिस्तानच्या सीमेला लागुन असणाया काश्मिरच्या सीमा रशिया चीन व अफगाणीस्तानला मिळत होत्या.लष्करी व भौगोलिक दृष्टया हे राज्य महत्त्वाचे होते.

१९४७ नंतरचा प्रश्न

काश्मिर भारतात विलीन व्हावे यासाठी सुरूवातीस भारताने काहीच प्रयत्न केले नाही.उलट त्यांनी पाकीस्तानात विलीन व्हायचे ठरविल्यास भारताला त्यात काही वावगे वाटत नव्हते.असा स्पष्ट निर्वाळा २८ आ^क्टो १९४७ रोजी क^म्पबेल जा^न्सन यांनी दिला होता.काश्मिर सारख्या महत्त्वाच्या प्रदेशावर पाकिस्तानद्वारा नियंत्रण ठेवता येईल अशी इंग्रजांना खात्री असल्याने काश्मिर पाकिस्तानात विलीन व्हावे अशी त्यांची इच्छा होती.जिना व धर्मवेडयांनाही काश्मिर पाकिस्तानात विलीन करून घ्यायचे होते.त्यांना ब्रिटिशांकडून सल्ला व मदत मिळत होती.संस्थान पाकिस्तानात विलीनीकरणास राजावर त्यांनी प्रचंड दबाव आणला.हरिसिंग राजास भारतातील लोकशाही व पाकिस्तानातील धर्मवाद दोन्हींची भीती वाटत होती.स्वत:चे संस्थान स्वतंत्र ठेवायचे होते.पण तेथील राष्ट्रीय परिषद पक्ष व त्याचे नेते शेख अब्दुल्ला याना संस्थान भारतात सामील करावे असे वाटत होते.तर नेहरू पटेल यांना तेथे सार्वमत घे}न कुठे सामील व्हायचे ते ठरवावे असे वाटत होते.

काश्मिर प्रश्नावरून युध्द

पाकिस्तानने काश्मिरी जनतेचा विचार न करता १९४७ मध्येच काश्मिर मध्ये घुसखोरी करून वर्चस्व निर्मितीस प्रयत्न सुरू केले.हिवाळयाच्या सुरूवातीस शेकडो पठाण काश्मिरमध्ये घुसले.व जलद गतीने राजधानी

श्रीनगरकडे निघाले.पाक लष्करी अधिकारी अनधिकृतपणे त्यांचे नेतृत्व करत होते.राजा हरिसिंगाच्या सैन्यास अपयश येऊ लागताच त्याने भारताकडे मदत मागितली.पण काश्मिर भारतात औपचारिकरित्या सामिल झाल्यावरच मदत करत करता येईल हे माऊंटबॅटनने लक्षात आणून दिल्यावर पटेल शेख यांनीही औपचारिक विलीनीकरणाचा आग्रह धरला.अखेर २६आ^क्टोबर रोजी हरिसिंगाने विलीनीकरणावर स्वाक्षरी केली.भारताने काश्मिर मध्ये शांतता सुव्यवस्था प्रस्थापित झाल्यावर तेथे सार्वमत घेण्यात येऊन निर्णय घ्यावयाचे ठरले.दरम्यान औपचारिक विलीनीकरणानंतर लष्करी मदत करण्यात आली.व घुसखोरांना श्रीनगर व काश्मिर खोयातून हाकलण्यात आले.

संयुक्त राष्ट्र संघटना व काश्मिर प्रश्न

भारत व पाक यात उघड युध्द होऊ नये.म्हणून संयुक्त राष्ट्र संघटनेत काश्मिर प्रश्न मांडण्याचे भारताच्या मंत्री मंडळाने ३० डिसेंबर १९४७ रोजी ठरविले.पण याबाबत पुढे नेहरूंना पश्चाताप करावा लागला.कारण सुरक्षा मंडळात इंग्लड अमेरिकेने काश्मिर प्रश्ना ऐवजी भारत पाक संघर्ष आपल्यापुढे आहे असा बदल करून घेत अनेक ठराव पास केले.व एका ठरावा नुसार ३१ डिसेंबर ४८ रोजी दोघांनी युध्द विराम मान्य केला.युनोत भारतास न्याय मिळेल ही अपेक्षा व्यर्थ ठरली.

१९५१ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेत ठराव केला गेेला की पाकीस्तान व्याप्त काश्मिरातून पाकने सैन्य मागे घेतल्यावर तेथे सार्वमत घ्यावे.पण या भागातून सैन्य मागे घेण्याचे पाकने नाकारले आहे.

काश्मिरच्या भारतातील विलीनीकरणानंतर घटनेच्या ३५० व्या कलमानुसार काश्मिरला विशेष राज्याचा दर्जा देण्यात आला.हळूहळु केंद्राचे राज्यातील अधिकार वाढविण्यात आले.१९५० पर्यंत नागरिकत्व मुलभूत अधिकार इ.बाबतीतील घटनेतील तरतुदी काश्मिरला लागु होत नव्हत्या.१९५१ मध्ये प्रौढ मताधिकारानुसार काश्मिरमध्ये घटना समितीची निवडणुक घेण्यात आली.या समितीने १९५४मध्ये भारतात सामिल होण्याचा निर्णय घेतला.सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र काश्मिरमध्ये ही लागू करण्यात आले.१९७५ मध्ये भारत सरकार व काश्मिर यात करार हो}न काश्मिर मध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याची तरतुर करण्यात आली.काश्मिर मुख्यमंञ्यास पूर्वी प्रधानमंत्री म्हटले जात असे.त्यास इतर राज्यांप्रमाणे मुख्यमंत्री म्हणण्यात येऊ लागले.

जुनागडचे विलीनीकरण

सौराष्ट्र किनारीभागात जुनागडचे संस्थान होते. जुनागडचे क्षेत्रफळ सव्वा तीन हजार चौरस मैल (३३३७) होते. जुनागढवर १७३० साली स्थापन झालेली बाबी घराण्याची सत्ता पुढे जुनागढ संस्थान १९४८ साली स्वतंत्र भारतात विलीन होईपर्यंत होती. बाबी घराण्याने जुनागढवर दोन शतके राज्य केले. बाबी घराण्यात एकूण नऊ नवाब झाले. स्वत:च्या नावापुढे हे बाबी नवाब 'खानजी' हा किताब लावत असत. भारतास स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी या संस्थानाची लोकसंख्या सात लाखाच्या आसपास होती. संस्थानातील अधिक तर प्रजा हिंदु होती. तर राजा (नवाब) महाबत खान रसूलखानजी हा मुस्लिम होता.

जुनागड सर्व बाजूंनी भारतीय प्रदेशाने वेढले होते.त्याचा पाकिस्तानशी कोणताही भौगोलिक संबंध नव्हता.तेथील प्रजेची भारतात सामिल होण्याची इच्छा होती पण जुनागड नबाबाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी संस्थान पाकिस्तानात विलीन केले.पाकिस्तानने स्थानिक लोकांच्या भावनांकडे दुर्लक्ष करून विलीनीकरण स्विकारले. जुनागडला जमीनीवरून पाकिस्तानशी संबंध ठेवता येणार नव्हता. पण समुद्रावरून संबंध ठेऊ असे नबाबाचे मत होते. नेहरू व पटेल यांना जनतेचे मत महत्त्वाचे वाटत होते.

जुनागडचे पाकिस्तानात विलीनीकरण झाल्यावर तेथील परिस्थिती बिघडत गेली.प्रजेने संस्थानिकांविरोधात चळवळ सुरू केली.आर्थिक कोंडी व लोकांचा विरोध पाहून नबाब परिवार व खजिन्यासह पाकिस्तानात पळून गेला. शहानवाज भुत्तो जुनागड संस्थानाचे दिवाण होते. त्यांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला. पण आर्थिक व लष्करी कोंडीमुळे भारत सरकारला मध्यस्थीसाठी पाचारण करण्यात आले. ९ नोव्हेंबर रोजी लष्कराने जुनागड मध्ये प्रवेश केला. ९ नोव्हेंबर १९४७ रोजी त्यांनी जुनागडला ताब्यात घेतले आणि तो दिवस (९ नोव्हेंबर) जुनागडचा स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा केला जातो.

भारताने विलीनीकरणाच्या अनुशंगाने कारवाईस सुरूवात केली. दिवाण शहानवाज भुत्तो यांनी शरणागती स्वीकारली. भुत्तो यांनी भारत सरकारला निवेदन दिल. भारताने ते स्वीकारलं व माउंटबॅटन यांच्या निर्णयानुसार भुट्टोंच्या अर्जानुसार कायदेशीररित्या जुनागड भारताला जोडण्याआधी तेथील लोकांचं मत आम्हाला जाणून घेणं आवश्यक असल्याचे ठरविले. सरदार वल्लभभाई पटेल याबाबत विरोधात होते त्यांना तेथे जनमताची आवश्यकता वाटत नव्हती. व जुनागडच्या लोकांचीही तशी मागणी नव्हती.

तरी प्राप्त परिस्थितीनुसार जुनागडमध्ये सार्वमत घेण्यात आले. जनतेने भारतात विलीन होण्याच्या बाजूने कौल दिला. २० फेब्रुवारी १९४८ रोजी हे जनमत घेण्यात आले. २ लाख १ हजार ४५७ नोंदणीकृत मतदारांपैकी १ लाख ९० हजार ८७० लोकांनी मतदान केले. यापैकी केवळ ९१ मते पाकिस्तानच्या बाजूनं पडली व फेब्रुवारी १९४८ मध्ये जुनागड संस्थान भारतात विलीन करण्यात आले.

हैद्राबादचे विलीनीकरण

भारतातील सर्वात मोठे संस्थान हैद्राबाद मध्ये निजामाची मुस्लिम राजवट होती. तर बहुसंख्य प्रजा हिंदु होती.निजामाने स्वतंत्र होण्याचा आपला मनोदय जाहीर केला होता.भारताने भारतात विलीन होण्यास निजामाला दोन महिन्याची मुदत दिली तेव्हा निजामाने काही अटी भारत शासनाला घातल्या पण भारताच्या गृहमंञ्यांनी या अटी फेटाळल्या.२४ नोव्हेंबर १९४७ रोजी निजामाने भारताशी जैसे थे करार केला.भारताने जालना व सिकंदराबादेतील लष्कर काढून घेतले.यानंतर पाकिस्तानच्या उत्तेजनाने निजामाने लष्कर उभारण्यास सुरूवात केली.

निजामाच्या कारवाया

निजामाने भारताचे चलन रद्द केले.किंमती धातू संस्थानाबाहेर निर्यातीस बंदी घातली.कराचीत जनसंपर्क अधिकारी नेमला. विमानतळ उभारणीस सुरूवात केली.कराचीतून शस्त्रास्त्रे आयात केली. लष्कर वाढविले व ४२००० लष्कर भारतावर हल्ला करण्यास तयार ठेवले.नबाब बहादुर यावर जंग याने १९२९ मध्ये रझाकार नावाची धर्मांध मुस्लिम व पठाणांची स्वयंसेवक संघटना निर्माण केली होती.कासीम रझवी हा यावेळी तिचा नेता होता.या संघटनेचीही निजामाने मदत घेतली शिवाय निमलष्करी दलही होतेच.सार्वमताच्या आग्रहाला तलवारीने उत्तर मिळेल असा दम रझवीने दिला.रझाकारांनी संस्थानात अत्याचाराला सुरूवात केली.हजारो हिंदुंच्या कत्तली केल्या.लुटमार केली.स्त्रियांना भ्रष्ट केले.लोकशाहीस विरोध करून निजामाचे सर्वंकष राज्य स्थापन करणे हा रझाकार संघटनेचा हेतू होता.मुंबई मद्रास व मध्यप्रदेशात घुसुन तेथे ही लूट चालविली.यामुळे भारत सरकारला हैद्राबाद संस्थान व निजामाबाबत कठोरपणे विचार करण्याची वेळ आली. " बिनशर्त विलीनीकरण व निर्भेळ जबाबदार सरकारची स्थापना याहून रेसभरही कमी आम्हाला मान्य होणार नाही असे निजामाला निक्षुन सांगण्याची वेळ आता ये}न ठेपली आहे." असे पटेलांनी नेहरूंना कळविले.

निजामावर भारत सरकारची कारवाई

निजामामुळे भारताची अंतर्गत सुरक्षा धोक्यात आली तेव्हा भारताने हैद्राबाद हद्दीवर लष्कर तैनात करून निजामाची आर्थिक कोंडी केली.काँग्रेसने सत्याग्रह मोहिम सुरू केली.तेलंगाणातील शेतकरी दले रझाकारांपासून लोकांचे रक्षण करू लागली.निजामाच्या कारवाया तरी चालू राहिल्याने १३ सप्टें.१९४८ रोजी मेजर जनरल चौधरी नेतृत्त्वात गुरका फलटन कारवाईसाठी भारत सरकारने पाठविली.विविध बाजूंनी भारतीय सैन्य हैद्राबादेत घुसले.तीन दिवसात निजाम शरण आला.भारत सरकारने त्यास औदार्याने वागविले त्यास शिक्षा न करता संस्थानाचा राजप्रमुख म्हणून नेमून त्याचे राज्यकर्तेपद नाममात्र ठेवले.तसेच त्याला वार्षिक ५० लाखाचा खाजगी तनखा दिला.त्याची संपत्ती त्याच्याकडेच राहू दिली.तर कासीम रिझवी व रझाकारांना कैद करून शिक्षा दिल्या.

हैद्राबाद संस्थानाबरोबर देशातील संस्थाने संघराज्यात विलीनीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाली.हैद्राबाद प्रकरण भारताच्या धर्मनिरपेक्षतेच्या विजयाचे आणखी एक उदाहरण होय.संस्थानांतील बहुसंख्य मुस्लिम निजामाविरूध्द लढयात सामील होते.शिवाय देशातील इतर मुस्लिमांचाही सरकारी कारवाईस पाठिंबा होता.

विलीनीकरणातील दुसरा टप्पा

सर्व संस्थाने संघराज्याचा एकजीव घटक बनण्याचा दुसरा कठीण टप्पा डिसेंबर १९४७ मध्ये सुरू झाला.पटेलांनी ही प्रक्रियाही वेगाने पूर्ण केली.लहान संस्थाने शेजारील प्रादेशिक राज्यात मिसळली.किंवा अशा सलग संस्थानांचे गट करून त्यास केंद्र शासित प्रदेश बनविले.अशा संस्थांनाचे ५मोठे संघ बनविले.

मोठया संस्थानांनी आपली सत्ता व अधिकार भारत सरकारला समर्पण केले.मोबदल्यात सरकारने संस्थानिकांना करमुक्त खाजगी तनखे नेमुन दिले.१९४९ मध्ये एकुण ४ कोटी ६६ लाखाचे तनखे देण्यात येत होते.ते राज्यघटनेने कायम केले.संस्थानिकांची गादी वारसा हक्काने चालू राहण्यास व त्यांच्या पदव्या बिरूदे तोफांची सलामी व खाजगी हक्क विशेषाधिकार कायम ठेवण्यास मंजूरी दिली.संस्थानिकांच्या या सवलतीवर मोठी टिकाही झाली.पण संस्थानी सत्ता नष्ट करण्याची व संस्थाने लवकर सहज भौगोलिक व राजकीय दृष्टया देशात सामावुन घेण्याची ती अल्पशी किंमत होती.पाकिस्तान वेगळा झाल्याने कमी झालेला प्रदेश लोकसंख्या या संस्थानांच्या सामिलीकरणामुळे काही प्रमाणात भरून निघाली.बिपिन चंद्रा यांच्यामते संस्थाने विलीनीकरणामुळे फाळणीच्या जखमा काही अंशी भरून निघाल्या.

सरदार पटेल व पंडित नेहरूंचे विलीनीकरणातील कार्य

विलीनीकरण समस्या भारताच्या ऐक्यासाठी मोठा धोका होती. कारण काही संस्थानिकांनी अडवणूक व देशविरोधी भूमिका स्विकारली होती.काहीना गोडीने तर काहीना बळाच्या आधारावर गृहमंत्री पटेलांनी भारतात विलीन करून घेतले.या शांततापूर्ण क्रांतीचे ते शिल्पकार होते.कमी कालावधीत एवढी जादा संस्थाने देशात विलीन करून घेण्याचे उदाहरण जगात दुसरे नाही.पटेलांचे कार्यक्षम सहायक व्ही.पी.मेनन यांचेही योगदान बहु मोल आहे.व या सर्वांना खंबीर पाठींबा देणारे पंतप्रधान नेहरू यांची भूमिकाही विलीनीकरणात महत्त्वाची ठरली.

पटेल व मेनन यांनी संस्थानिकांशी प्रत्यक्ष वाटाघाटी करून राजनैतिक कौशल्याद्वारे कायदेशीतरित्या विलीनीकरण घडवुन आणले.पटेलांचे कणखर नेतृत्त्व दरारा यामुळे संस्थानिक विलीनीकरणास तयार झाले.पटेलांनी विलीनीकरणाची निती आखली व मेनन यांनी ती वेगाने राबवत स्वातंत्र्यानंतर २ वर्षात सर्व संस्थाने विलीन करून घेतली.काश्मिर जुनागड व हैद्राबाद वगळता ५ लक्ष चौ.मै.चा प्रदेश व ९० लक्ष लोकसंख्या गोळीचा वापर न करता सहज विलीन झाली.

संस्थानी प्रजेच्या जुन्या सरंजामशाही निष्ठेचे रूपांतर आधुनिक घटनात्मक राज्य संकल्पनाना स्वेच्छेने दिलेल्या स्विकृतीत झाले.संस्थानिकांच्या अडवणुकीच्या धोरणामुळे देशाचे ऐक्य धोक्यात येईल आपले स्वातंत्र्य संस्थानांच्या दरवाज्यातून नाहीसे होईल याची पटेलांना जाणीव होती. म्हणून त्यांनी विलीनीकरणाचे धोरण कसोशीने राबविले.म्हणूनच त्यांना पोलादी पुरूष म्हणून संबोधले जाते.व पटेलांच्या धोरणांना पाठिंबा देणाया नेहरूंनाही विलीनीकरणाचे श्रेय दिले जाते.

घटक १ : स्वातंत्र्य आणि फाळणी

इ) भारतीय राज्यघटना आराखडा आणि वैशिष्ट्ये

राज्यघटनेची वैशिष्ट्ये

१.विस्तृत लिखित राज्यघटना

जगामध्ये दोन प्रकारच्या राज्यघटना अस्तित्वात आहेत . लिखित राज्यघटना व अलिखित राज्यघटना अमेरिकेच्या राज्यघटनेत फक्त १४ कलमे आहेत. भारताच्या राज्यघटनेमध्ये ८ परिशिष्टे व ३९५ कलमे होती. सध्या १२ परिशिष्टे व ४५० कलमांचा समावेश करण्यात आला आहे.

२.लवचिक व ताठर राज्यघटना

अमेरिकन राज्यघटना ही खूपच ताठर आहे. कारण या राज्यघटनेतील कलमांमध्ये सहजासहजी बदल, दुरुस्त्या करता येत नाहीत. तर ब्रिटिश राज्यघटना ही खूपच लवचिक आहे. मात्र घटनाकर्त्यांनी या दोन्हींचा विचार करून मधला मार्ग निवडला आहे. काही कलमांची दुरुस्ती ही सहज करता येते तर काही कलमांच्या दुरुस्तीसाठी विशेष अशा बहुमताची गरज असते

३.विविध स्त्रोतांपासून निर्मिती

राज्यघटना बनवत असताना इतर देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करण्यात आला. या राज्यघटनेवर १९३५ च्या कायद्याचा जास्त प्रभाव दिसतो. अमेरिकन राज्यघटनेवरून मुलभूत हक्क / न्यायालयीन पुनर्विलोकन या बाबींचा समावेश भारतीय राज्यघटनेत करण्यात आला. आयर्लंडच्या राज्यघटनेवरून मार्गदर्शक तत्वांचा स्वीकार करण्यात आला.

४.मुलभूत हक्क

राज्यघटनेनुसार देशातील नागरिकांना काही मुलभूत हक्क देण्यात आलेले आहेत. राज्यघटनेमध्ये एकूण सहा प्रकारचे मुलभूत हक्क देण्यात आले आहेत. मुलभूत हक्कांचा समावेश राज्यघटनेच्या तिसऱ्या विभागामध्ये करण्यात आला आहे.

५.मुलभूत कर्तव्य

१९७६ च्या ४२ व्या घटनादुरुस्तीन्वये राज्यघटनेमध्ये एकूण ११ कर्तव्यांचा समावेश करण्यात आला आहे. मुलभूत कर्तव्यांचा राज्यघटनेमध्ये समावेश करण्यासाठी स्वर्ण सिंग समितीची स्थापना करण्यात आली होती. या समितीच्या शिफारसीनुसार राज्यघटनेमध्ये मुलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला. मात्र मुलभूत कर्तव्यांबाबत कायदेशीर बंधने घालण्यात आलेली नाहीत. ही केवळ आदर्श आहेत.

६. निधर्मी राष्ट्र

पाकिस्तान हे एक इस्लाम धर्म असणारे राष्ट्र आहे. मात्र भारतामध्ये वेगवेगळ्या धर्माचे लोक राहतात. कोणत्या एका धर्माला जास्त महत्व न देता सर्वांना समानता देण्यात आली आहे. सार्वजनिक सुव्यवस्था, नितीमत्ता, आरोग्य

यांना बाधा न आणता सर्वांना धार्मिक आचरण करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. अल्पसंख्यांकांना शिक्षण संस्था स्थापण्याचा व चालवण्याचा अधिकार देण्यात आला आहे

७. मार्गदर्शक तत्वे

घटनेच्या चौथ्या भागामध्ये मार्गदर्शक तत्वांचा समावेश करण्यात आला आहे. शासनाने आपला राज्यकारभार कोणत्या उद्देशासाठी करावा हे स्पष्ट करणारी मार्गदर्शक तत्वे घटनेमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. ही मार्गदर्शक तत्वे राजकीय, सामाजिक, आर्थिक, मानवहित, आरोग्य यासंबंधी आहेत. या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी कशी होते, त्यावरून त्या राज्याच्या शासनाच्या कार्याचे मूल्यमापन होत असते.

८. एकेरी नागरिकत्व

अमेरिकेमध्ये संघाचे व राज्याचे असे वेगवेगळे नागरिकत्व दिले जाते. भारतामध्येही अनेक राज्य अस्तित्वात आहेत, मात्र या प्रत्येक राज्यांना वेगवेगळे नागरिकत्व न देता सर्वांसाठी एकच (एकेरी) नागरिकत्व देण्यात आले आहे .

९. स्वतंत्र व एकेरी न्यायव्यवस्था

संपूर्ण देशासाठी एकसूत्री न्यायव्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. सर्व देशासाठी सर्वोच्च न्यायालय हे अंतिम न्यायालय आहे.

१०. मतदानाचा अधिकार

पहिल्यांदा २१ वर्ष पूर्ण झालेल्या व्यक्तींना मतदानाचा अधिकार देण्यात आला होता.मात्र १९८९ मध्ये ५१ व्या घटनादुरुस्तीनुसार १८ वर्ष पूर्ण झालेल्या व्यक्तींना मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे.

११. आणीबाणीची तरतूद

काही घटनात्मक पेचप्रसंगाच्या वेळी देशामध्ये गोंधळ निर्माण होण्याची शक्यता असते, अशा वेळी आणीबाणी लागू केली जाते. हे आणीबाणी लागू करण्याचे अधिकार राष्ट्रपतींना देण्यात आले आहेत. या आणीबाणीच्या काळामध्ये केंद्र हे प्रबळ बनते. राज्याचे सर्व अधिकार केंद्राकडे जात असतात.

१२. त्रि - स्तरीय सरकारची स्थापना

केंद्र, राज्य, पंचायत राज यानुसार पूर्ण देशासाठी केंद्र सरकार असून, ही एक उच्च अशी शासनव्यवस्था आहे. प्रत्येक राज्यासाठी राज्य सरकारची निर्मिती करण्यात आली आहे.